<u>**निशाणी क्रमांक ६९ वरील आदेश**</u>

१) वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश–६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दिला आहे.

२) वादीने निशाणी ६६ वर दाव्यात दुरुस्तीसाठी अर्ज दिला होता. सदर अर्ज न्यायालयाने मंजूर केला असून सदरची दुरुस्ती अर्जामध्ये वादीच्या वकीलांनी सुधारीत दाव्यातील कथनाप्रमाणे व त्यातील परिच्छेद ओळीप्रमाणे दाखल केलेला आहे. परंतू निशाणी ६६ अर्जातील दुरुस्ती ही मुळ दाव्यात करण्याचे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्ज हा निशाणी ६६ आदेशाप्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

३) वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले.

४) वादीने निशाणी ६६ अर्ज हा सुधारीत दाव्यातील कथनाप्रमाणे व त्यातील परिच्छेद व ओळीप्रमाणे दाखल केल्याचे दिसून येते. निशाणी ६६ अर्जातील दुरुस्ती ही मुळ दाव्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे निशाणी ६६ वरील मंजूर झालेल्या दुरुस्ती आदेशाप्रमाणे वादीस मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्याययोग्य होईल. या कारणास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. दुरुस्ती अर्ज (नि.क्र.६६) वरील आदेशाप्रमाणे वादीला मुळ दाव्यात सदर अर्जात नमूद केलेल्या मजकूरा प्रमाणे दुरुस्ती करण्याचे परवानगी देण्यात येते.

२. वादींनी दाव्यात या अर्जातील नमूद दूरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी.

३. वादींनी दूरुस्त दावा अभिलेखावर दाखल करावा व त्याची प्रत प्रतिवादींना द्यावी.

स्वाक्षरीत/—

दिनांक : ०१.१०.२०१९

(भारत सं. गायकवाड)
सह दिवाणी न्यायाधीश
(क. स्तर)बदनापूर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा आहे.

कनिष्ठ लिपीकाचे नाव – एस. आर. दोडके. कनिष्ठ लिपीक.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बदनापूर.

स्वाक्षरीत/—
कनिष्ठ लिपीकाचे नाव